# Trends in Commerce, Economics & Life Sciencess

कला, वाणिज्य व विज्ञान
कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

**Chief Editor**

**Dr. B. M. Dhoot**

**Dr. S.V. Kshirsagar**

**Co-Editor**

**Dr. S.B. Donge**

**Dr. G.A. Bhurke**

**Dr. S.U. Kalme**

ISBN No. 978-93-83995-60-9
Anuradha Publications, Nanded

# Trends in Commerce, Economics & Life Sciencess

**Chief Editor**
Dr. B. M. Dhoot
Dr. S.V. Kshirsagar

**Co-Editor**
Dr. S.B. Donge
Dr. G.A. Bhurke
Dr. S.U. Kalme

**ISBN No.** 978-93-83995-60-9

**Published by:**
Anuradha Publications
Cidco-Nanded

**Publication Year:** 2021-22

**Price-** Rs. 190/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**
Gurukrupa Offset,
Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**
Simran Computers
Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**
Mr. Imran K. Mohammad

# CONTENTS

| Sr. No. | Content |
|---|---|
| 01 | Black Money and its Disastrous Influence on Indian Economy |
| 02 | Obstacles and the Importance of Commerce Education |
| 03 | To Study the Leaf Extract of Some Medicinal Wild Plants on Growth of Macrophomina Phaseolina (Tassigoid) Causing Root Rot Disease of Sapgandha |
| 04 | A Review of New Challenges in Internet Banking and Its Benefit |
| 05 | Studies on Growth of Macrophomina phaseolina isolated from infected roots of Sarpagandha on Selected Media |
| 06 | Applications and Challenges of Nanotechnology |
| 07 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०: उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा |
| 08 | Studies on root rot of Rauwolfia serpentina L. Benth ex Kurz caused by Macrophomina Phaseolina (Tassi) Goid |
| 09 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार |
| 10 | Commerce Education: Challenges and Solutions |
| 11 | Studies on Rauwolfia tetraphylla Benth. Ex. Kurz. (Sarpaghandha) |

कला, वाणिज्य व विज्ञान
कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०: उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा

प्रा.डॉ.सचिन खोकले
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गंगाखेड जि.परभणी

## प्रस्तावना

राज्यातील उच्च शिक्षणात नवीन शैक्षणिक धोरणाची तंतोतंत अंमलबजावणी २०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून होईल, असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठे, महाविद्यालयांनी गुणवत्तेचा स्तर वाढवावा. नॅक मूल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांना नोटीस देण्यात आली असून सहा महिन्यात प्रक्रिया न करणाऱ्या महाविद्यालयांची शिष्यवृत्ती, इतर सुविधा थांबविण्याचीकारवाई करण्यात येईल असे म्हटले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे.

## उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा

उच्च शिक्षणक्रमात नवीन शैक्षणिक धोरणानुसार अनेक मोठे बदल सुचवलेले आहेत. संपूर्ण देशात ४० हजारांहून अधिक महाविद्यालये बंद करून सक्षम अशी केवळ पंधरा हजार महाविद्यालये उच्च शिक्षणासाठी चालू ठेवण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. शालेय शिक्षणात महत्त्वाचे बदल करताना, दुसरीकडे महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणातही आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न या धोरणात दिसतो. ज्या देशांमध्ये महाविद्यालयीन शिक्षणपद्धती चांगली आहे त्यांचा अभ्यास करून त्यातल्या काही गोष्टी स्वीकारण्यात आल्याचे दिसते. बहुशाखीय प्रणाली स्वीकारण्यात आली आहे. त्यामुळे कला, वाणिज्य, विज्ञान अशा शाखांदरम्यान सध्या असलेल्या

भिंती दूर होतील. त्यातून विद्यार्थ्यांना हवा तो विषय स्वीकारण्याचे स्वातंत्र्य मिळेल. शिक्षणात लवचीकता येईल. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) खरे तर ही प्रणाली याआधीच तत्त्वत: स्वीकारली आहे, पण महाविद्यालयांत ते अभ्यासक्रमच उपलब्ध नसतात. आता त्यावर उपाय म्हणजे अनेक महाविद्यालयांनी एकत्र येऊन महाविद्यालयांचे संकुल (cluster) विकसित करावे, असे सुचवण्यात आले आहे. म्हणजे एखाद्या महाविद्यालयात विज्ञान शाखेचे शिक्षण देण्याची सुविधाच नसेल, तिथे केवळ कला आणि वाणिज्य शाखेचेच अभ्यासक्रम उपलब्ध असतील, तर त्या महाविद्यालयातल्या मुलांना विज्ञानाचे अभ्यासक्रम उपलब्ध असलेल्या जवळच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळू शकेल. यातून काही संस्थांचे एकत्रीकरण होईल. एकत्रित झालेल्या संस्था मोठय़ा होत जातील. पुढे त्यांना विद्यापीठाचे रूप येईल. अशा मोठय़ा संस्थांना नंतर स्वायत्तता द्यावी लागेल. त्या स्वत: पदवी देतील, स्वत: अभ्यासक्रम ठरवतील. त्यांची विद्यार्थिसंख्याही उत्तरोत्तर वाढत जाईल. विद्यार्थिसंख्या एका मर्यादेपलीकडे गेली की, संस्थेचे विभाजन केले जाईल. नव्या शैक्षणिक धोरणातून, अशीच काहीशी व्यवस्था अपेक्षित असल्याचे दिसते. याची योग्य अंमलबजावणी झाली, तर विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, सर्जनशीलतेला वाव मिळेल. शिक्षण संस्थांचा दर्जा सुधारल्यास चांगले शिक्षक त्या संस्थांशी जोडले जातील. संशोधनाचे प्रमाण, आवाका वाढेल. भारतात १९ ते २४ वयोगटातील केवळ २६ टक्केच विद्यार्थी महाविद्यालयांत शिकतात, असे यात म्हटले आहे. जगात हे प्रमाण साधारण ५२ टक्के आहे. भारतातही महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत पोहोचलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढावे, यासाठी प्रयत्न करण्यात आल्याचे म्हटले आहे. म्हणजे थोडक्यात शिक्षण बहुशाखीय, स्वायत्त आणि लवचीक करण्याच्या तसेच शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षणाच्या प्रवाहात असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्याच्या दृष्टीने या धोरणात पावले उचलण्यात आली आहेत. या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण, शिक्षण संस्थांचे मूल्यमापन करणारी अधिक सक्षम व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

एम.फिल. ही पदवी रद्द करण्यात आली आहे. पीएच.डी.ला प्रवेश घेण्यापूर्वी त्या विषयाची काही लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा देऊन त्या विद्यार्थ्याला आपली पात्रता सिद्ध करावी लागेल. संशोधन हे केवळ नावापुरते किंवा पूर्वी केलेल्या एखाद्या कामाची पुनरावृत्ती असू नये. त्यातून समाजाच्या विकासासाठी अथवा समाजाच्या काही अडीअडचणी सोडवण्यासाठी काही मदत व्हावी. काही नवीन तंत्रज्ञान किंवा नवीन उपकरणे या संशोधनातून उपलब्ध व्हावीत. या सर्व संशोधन प्रकल्पांचे कसून सर्वेक्षण करण्यात येईल व उत्तम प्रकारच्या संशोधनांना आर्थिक व अन्य सुविधांच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात येईल.

**उच्च शिक्षण आणि संशोधन**

उच्च शिक्षणामध्ये संशोधन विषयास अधिक महत्त्व दिले जाणार आहे. संशोधन विषयासाठी आवश्यक असलेल्या सुविधा सर्व महाविद्यालयांत उपलब्ध होणार नाहीत. उदाहरणार्थ, रसायनशास्त्र विषयात संशोधन करायचे असेल तर जी.सी., एच.पी.एल.सी., एफ.टी.आय.आर., एन.एम.आर., यू.व्ही. व्हिजिबल स्पेक्ट्रोफोटोमीटर यासारखी उपकरणे उपलब्ध करून द्यावी लागतील. ही उपलब्ध करून देण्याची क्षमता मोजक्या संस्थांकडे असू शकते. केंद्रस्थानी असलेल्या महाविद्यालयांना अशी उपकरणे विकत घेण्यासाठी राज्य अथवा केंद्र सरकारने विशेष निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. केंद्रस्थानी असलेल्या या संशोधन केंद्राचा उपयोग संकुलातील इतर महाविद्यालये करून घेतील. अशी व्यवस्था अधिक व्यावहारिक होईल. कला, वाणिज्य अथवा व्यवस्थापन विषयातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी सर्वेक्षण करण्याची आवश्यकता असते. त्याची प्राथमिक जुळणी करून देण्याचे काम एखाद्या विशिष्ट गटाकडे सोपविले, तर संशोधकांचे काम अधिक सोपे होईल. संशोधन हे समाजाला उपयुक्त ठरावे, यातून समाजातील काही ना काही समस्येवर उत्तर मिळावे ही अपेक्षा आहे. त्यामुळे संशोधनाचा दर्जा तपासणे, त्याची उपयुक्तता तपासणे, निकृष्ट दर्जाचे किंवा कोणाची तरी नक्कल करून केलेले संशोधन वेगळे काढता येण्यासाठी, तसेच उत्तम दर्जाचे संशोधन मान्यवर जर्नलमध्ये प्रसिद्धीसाठी पाठविणे, त्याचे पेटंट करून घेणे अशा प्रक्रिया करण्याकरता एक वेगळा कार्यगट निर्माण करावा लागेल. हा कार्यगटही त्याच्या संकुलातील केंद्रस्थानी असलेल्या महाविद्यालयाच्या मदतीनेच करावा लागेल. जगातील सर्व विकसित देशांच्या तुलनेत भारतात चाललेले संशोधन अत्यंत अपुरे, निकृष्ट दर्जाचे आहे अशी टीका वारंवार केली जाते. त्यात तथ्यही आहे. संशोधनास योग्य दिशा देणे व त्याचा देशाच्या विकासाला उपयोग करून देणे याची ही सुवर्णसंधी आहे व अभिमत विद्यापीठे किंवा ऑटोनॉमस कॉलेजेस ही सुवर्णसंधी उचलू शकतात.

**निष्कर्ष**

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे, संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

उच्च शिक्षणाच्या संदर्भात multiple entry and exit यामुळे विध्यार्थी गळतीचे प्रमाण वाढू शकते. कुठल्याही उच्च शिक्षण संस्थेचे स्वरूप हे आंतरविद्याशाखीय असलेच पाहिजे, अशी अपेक्षा हे धोरण मांडते, तसेच प्रत्येक शिक्षण संस्थेत सुमारे तीन हजार विद्यार्थी असावेत,

ही अपेक्षा आहे. त्यामुळे सध्याच्या एकशाखीय/ द्विशाखीय महाविद्यालयांचे पुढील दहा वर्षांत एकमेकांत विलीनीकरण होणे भाग आहे. विलीनीकरणानंतर प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेचे रूपांतर हे 'संशोधनकेंद्रित विद्यापीठ' किंवा 'अध्यापनकेंद्रित विद्यापीठ' अथवा 'स्वायत्त पदवी महाविद्यालय' या तीनपैकी एका प्रकारात होईल. यापैकी स्वायत्त महाविद्यालये हीदेखील बहुशाखीयच असतील आणि विद्यापीठांशी संलग्न नसतील. तसेच त्यांना पीएच.डी.सारख्या संशोधनाधारित पदव्या देता येणार नाहीत. मात्र आज वेगवेगळ्या विश्वस्त मंडळांखाली असलेल्या महाविद्यालयांनी विलीनीकरण कसे प्रत्यक्षात आणावे, याबद्दल हे धोरण काहीही मार्गदर्शन करत नाही.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. नव्या आर्थिक धोरणामध्ये मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तसेच शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट हा उपक्रम आणला आहे.

संदर्भ:

१. नवीन शैक्षणिक धोरण शासन निर्णय
२. लोकसत्ता पेपर, दि. 7 ऑगस्ट , 2020
३. https://mr.m.wikisource.org

*****

कला, वाणिज्य व विज्ञान
कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय